
भयानक ! भयानक !

एक यहूदी लोककथा




पुनर्कथन: रॉबिन बर्नस्टीन

भयानक ! भयानक !

एक यहूदी लोककथा




मराठी: अश्विनी बर्वे




अबीगैलची आई म्हणाली, “मी तुझ्यावर नेहमी प्रेम करेन.”

पण ती खरंतर अबीगैलशी बोलत नव्हती.


अबीगैलच्या नवीन सावत्र वडील म्हणाली, “मी ही नेहमी तुझ्यावर प्रेम करत राहीन,” आणि त्यांनी एकमेकांच्या बोटात अंगठ्या घातल्या. मग त्या दोघांनी डिश-टॉवेलने झाकलेल्या ग्लासाला आपले पाय लावले आणि प्रत्येकजण ओरडले : अभिनंदन!”



पण अबीगैल ओरडली नाही. तिने आपले ओठ चावले जसे ती नेहमी काळजीत असतांना करत असे. लग्नानंतर ती आपल्या आईबरोबर आपल्या नवीन सावत्र वडील आणि नवीन सावत्र बहीण भाऊ यांच्याबरोबर राहण्यास गेली. घरात एकूण सात लोक होते. अबीगैल त्यांच्यात सगळ्यात लहान होती.



एवढ्या लोकांबरोबर राहणे सोप्पे नव्हते. जेव्हा अबीगैलला बाथरूमचा उपयोग करायचा असे, तेव्हा तिथे कोणीनाकोणी तिथे हजर असे. जर तिला टिव्ही बघायचा असे तेव्हाही कोणी इतर चॅनल बघत असे.जर तिला सफरचंद खावे वाटत असे, तेव्हा कोणीतरी आधीच ते खाल्लेले असे. आणि सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे अबीगैलला एकटं राहण्यासाठी कोणतीही जागा नव्हती.



“हे घर खूप छोटे आहे!” तिने आपल्या आईकडे तक्रार केली. “इथला प्रत्येक कोपरा लोकांनी आणि भंगार गोष्टींनी भरलेला आहे.”


“आपण एक मोठे घर खरेदी करू शकत नाही,” अबीगैलची आई म्हणाली.

“आपण लोकांपासून सुटका करू शकत नाही,” तिच्या सावत्र वडिलांनी सांगितले . “आणि तसेही मला भंगार आवडते.”


“जर मला काही दुसरे सुचले तर तुम्ही त्याचा उपयोग करून बघाल का?” अबीगैलने विचारले.

“मी वचन देते की आम्ही नक्कीच ते करून बघू,” तिची आई म्हणाली.


“हो,“ तिचे सावत्र वडिल सहमत होत म्हणाले. “हे घर माझ्यासाठी सुद्धा थोडे गर्दीचे आहे.”




अबीगैलला जी बुद्धिमान व्यक्ती माहीत होती ती रब्बी म्हणजे यहूदी पुजारी होते रब्बी मोठ्या किंवा छोट्या कोणत्याही समस्येचे समाधान करू शकत असत. ते एखाद्या लहान मुलाला आशिर्वाद देऊ शकत असत, दुःखी लोकांचे सांत्वन करू शकत असत आणि इतके सुंदर धून वाजवू शकत की जो कोणी ती ऐके त्वरित आपल्या पायावर उभे राहून नाचत असे. अबीगैलला खात्री होती की रब्बी नक्की तिला मदत करू शकतील.



"रब्बी," अबीगैल म्हणाली, “माझ्यासमोर एक समस्या आहे. माझी आई आणि सावत्र वडील आणि चार नवीन भाऊ बहिणी आणि मी आम्ही सगळे एका खूप छोट्या घरात राहतो.तिथे प्रत्येकाला जागेची कमी खूप जाणवते. मी कोणाला तरी धडकल्या शिवाय खोलीत चालू शकत नाही. पण आमच्याजवळ मोठे घर खरेदी करण्यासाठी पैसा नाही. रब्बी, मी काय करायला हवे?”




रब्बी यांनी गंभीरपणे विचार केला. मग ती म्हणाली, “तुझ्याजवळ आणि तुझ्या बहीणभावांजवळ सायकली आहेत का?” “ हो आहेत,” अबीगैल म्हणाली. “आणि माझ्या आईवडिलांकडे सुद्धा सायकली आहेत.आम्ही त्या गैरेजमध्ये ठेवल्या आहेत.”




"अच्छा, तर त्या घरात घेऊन ये,” रब्बी म्हणाली.

“पण तिथे काहीच जागा नाही!” अबीगैल ओरडत म्हणाली, "घर लवकरच तुटून जाईल आणि काडेपेटी सारखे पडेल!”

“माझ्यावर विश्वास ठेव, ”रब्बी म्हणाल्या. “बघ,सगळ्या सायकली घरात घेऊन ये.”



मग अबीगैलने सर्व सात सायकली ओढत त्या छोट्या घरात घेऊन आली. तिने दोन स्वयंपाकघरात ठेव्वल्या, एक फ्रिजच्या समोर आणि दुसरी शेगडी समोर. तिने बाहेरच्या खोलीत दोन सायकली ठेवल्या आणि सोफ्यावर एक सायकल ठेवली. तिने के हॉलमध्ये ठेवली आणि एक सायकल छताला लटकवली. शेवटची सायकल तिने बाथटबमध्ये ठेवली.




"रब्बीने हा सल्ला दिला होता का?” अबीगैलच्या आईने विचारले.


“कदाचित ती मजा करत असेल.”

"'रब्बीला किस्से सांगायला आवडतात,” अबीगैलने उत्तर दिले. “पण मला वाटते की यावेळी ती गंभीर होती. लक्षात आहे ना तुम्ही माझे विचार वापरून बघणार आहात.”


“हो आम्ही वचन दिले होते, तिचे सावत्र वडील गंभीरपणे म्हणाले आणि त्यांनी सायकल घरात ठेवली.



दुसऱ्या दिवशी हालत खूप खराब झाली. स्वयंपाक करायला किंवा अभ्यास करायला किंवा अंघोळीसाठी किंवा सभ्यतेने बोलण्यासाठी एकही जागा शिल्लक नव्हती.




"रब्बी," अबीगैल म्हणाली, “मला माहीत आहे की मी तुम्हांला कालच भेटली होती. मला वाटते की मी तुमचे म्हणणे चुकीच्या पद्धतीने घेतले. मी घरात सायकली ठेवल्या,पण त्याने समस्या अजून भयानक झाली-आधी पेक्षा अधिकच वाईट झाली. रब्बी, आता मी काय करायला हवं?”




रब्बीने खूप वेळ विचार केला आणि मग विचारले: “तुमच्याकडे पाळीव प्राणी आहेत का?”

“हो," अबीगैल म्हणाली, “आमच्याकडे तीन मांजरी आणि दोन कुत्री आहेत, एक ससा आणि एक गिनी पिग पण आहे. आम्ही त्यांना परसदारी ठेवतो.



''त्यांना पण घरात घेऊन ये.”


"रब्बी!" अबीगैलला तर धाप लागली. “घरात आधीच काही जागा नाही. घराचे तुकडे तुकडे होऊन विखरून जाईल.” पण रब्बी आपल्या म्हणण्याला अडून बसल्या.



जेव्हा अबीगैलची आई घरी आली तेव्हा तिने बघितले की गिनी पिग स्वयंपाकघरात मोकळी फिरत आहे तेव्हा ती ओरडली, "जर रब्बी मजा करत नसेल तर त्या एक क्रूर खेळ खेळत आहे!"

अबीगैलने उत्तर दिले, "रब्बीला खेळी करण्याचा छंद आहे. पण त्या म्हणाल्या की यामुळे आपल्याला मदत होईल."

"आपले घर बरबाद होईल" आई ओरडत म्हणाली. आणि त्यांचे म्हणणे खरे झाले. कुत्री पूर्ण घरात धावू लागले, आपली शेपटी हलवत त्यांनी कपाटातून खेळणी पाडली. मांजरांनी फर्निचर ओरबाडले. ससा आणि गिनी पिग कुठेच दिसत नव्हते पण त्यांच्या पायाच्या खुणा सगळीकडे दिसत होत्या..




अबीगैल म्हणाली, "रब्बी, तुम्ही सांगितले तसेच मी काल केले.पण स्थिति अजून भयानक, गंभीर, आणि आधीपेक्षा अधिक बिघडली! कुत्री भुंकतात, मांजरे म्याव करत आहेत. पण ससा आणि गिनी पिग शांत आहेत. असे वाटते की आम्हांला एखाद्या मुरांब्याच्या बाटलीत भरले आहे. रब्बी, मी काय करायला हवे.?"

"तुला चुलत भावंडे आहेत का?" रब्बीने विचारले.

"हो," अबीगैल म्हणाली. "डझनावरी चुलत भावंडे आहेत."

"त्यांना घरी राहायला बोलव." बुद्धिमान रब्बी म्हणाल्या.

"तुम्ही हे खरंच गंभीरपणे म्हणत आहात का?" अबीगैलने विचारले.पण रब्बी आपल्या म्हणण्यावर अडून बसल्या.




अबीगैलने त्यांचे म्हणणे मानले आणि तिने आपल्या सर्व चुलत भावंडांना आपल्या बरोबर राहण्यास बोलावले. “मी आपला विचार बदलला आहे! त्या रब्बी ना मजा करत आहेत ना आपल्या बरोबर क्रूर खेळ खेळत आहेत. त्या एकदम वेड्यासारखी वागत आहे.



"कधी–कधी सगळ्यात बुद्धिमान लोक वेडे वाटतात," अबीगैलने उत्तर दिले, पण तिला आपल्या कृतीवर शंका येऊ लागली होती.


"मला माहीत आहे की आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवण्याचे वचन दिले होते," आई म्हणाली. “पण एका गडगडाटाने आईचा आवाज दाबला गेला. हृदय पिळवटून टाकणारा तो आवाज होता.



“हॅलो!" घरात घुसत तिची चुलत भांवडे किंचाळले.


"ओह!" अबीगैल म्हणाली, कारण तेवढ्यात एका चुलत बहिणीने तिच्या पायाच्या बोटावर पाय ठेवला होता.

"अरे!" तिचे सावत्र वडील म्हणाले,कारण तेवढ्यात एका चुलत भावाने त्यांच्या पोटात ढोपर घातलं. चुलत भावंडे वसंतात येणाऱ्या पुरा सारखे घरात पसरले. वीस चुलत भावंडे दिवाणखान्यात घुसले, पंधराजण स्वयंपाकघरात घुसले, आणि आठजणांनी बाथरूम जाम केले. ते जेवले, गाणी म्हटली आणि पहाटेपर्यंत ते नाचत राहिले.




दुसऱ्या दिवशी, अबीगैलच्या आईने थकलेल्या आवाजात म्हटले, "अबीगैल, कृपया आपल्या चुलत भावाबहिणींना पाठवून दे.”

“मी रब्बीकडे परत जात आहे,” अबीगैलने म्हटले, अर्थात बोलण्यासाठी तिच्या फुप्फुसात दम शिल्लक नव्हता.




"रब्बी," अबीगैलने आपले सुन्न हात-पाय मोडत म्हणाली, "रब्बी, मी तुमचा सल्ला मान्य केला,पण स्थिती आता अति-भयानक आणि सहन करण्याच्या पलीकडे झाली आहे. घरात एवढी गर्दी आहे, की मी आपले अश्रू पुसण्यासाठी सुद्धा हात उचलू शकत नाही. मला मांजरी आणि कुत्र्यांच्या रडण्याचा आवाज ऐकू येतो, पण मला ते दिसू शकत नाहीत,कारण मला एक पाऊल पण उचलून टाकणे शक्य नाही. माझे कुटुंब सायकली, पाळीव प्राणी आणि चुलत भावंडे यांच्यामध्ये गायब झाले आहे. भिंती कण्हत आहेत,फरशी रडत आहे आणि मला भीती वाटते की घराचे छत तुटून जाण्याची. रब्बी, आम्ही काही गमावण्याच्या आधी कृपया आम्हांला मदत करा आणि मला अजून काही नवीन जोडण्यास सांगू नका कारण घरात टूथपिकसाठी सुद्धा जागा नाही.



बुद्धिमान रब्बी हसल्या. “आपल्या चुलत भावडांना त्यांच्या घरी जाण्यास सांग. “अच्छा, आता आपल्या तीन मांजरांना, दोन कुत्र्यांना,ससा आणि गिनी पिगला बाहेर परसदारी सोडून दे. आपल्या सात सायकलीसुद्धा गैरेजमध्ये घेऊन जा. मग आपले कुटुंब शोध आणि सगळे मिळून एकत्र स्वयंपाक करा. मग जेवा आणि त्यानंतर एकमेकांबरोबर फरशी साफ करा.”


"ओह, रब्बी," अबीगैल म्हणाली, “मला आशा होती की तुम्ही हेच सांगाल.”



मग अबीगैल आपल्या घरी गेली,जे फुग्यासारखे गोल गोल वाढत होते. तिने समोरचा दरवाजा उघडला आणि अठरा चुलत भावंडाची गर्दी बाहेर पडली.


"माफ़ करा! मला माफ करा!" अबीगैल ओरडत दिवाणखान्यात गेली, जिथे तिची चुलत भावंडे नाचत होती. अबीगैलने रेडिओ उचलला आणि एक रांग सुरु केली, चुलत भावंडांनी एक दुसऱ्यांचा हात पकडत तिच्या मागे गेले आणि शेवटी ते दरवाज्याच्या बाहेर गेले. मग अबीगैलने रेडिओ एका उंच चुलत भावाकडे सोपवला आणि ती त्यांना जातांना बघत राहिली. ते भर रस्त्यावर धुंद होऊन नाचत होते.






अबीगैल आपल्या आईला आणि सावत्र वडिलांना आणि आपल्या चार भाऊ आणि बहिर्णींना भेटली. ते जरा थोडेसे हलले होते आणि थोडेसे नाराज होते. तीन मांजरी, दोन कुत्री, ससा आणि गिनी पिग हळूवार आवाज करत परसदारी गेले. सर्व सायकली गैरेजमध्ये गेल्या. मग ते बाजारात गेले आणि प्रत्येकाने आपल्या आवडीचे खाणे निवडले. पाव, गाजर, भुईमुगाच्या शेंगा, लोणचे, द्राक्षाचा रस, अबीगैलने भजी निवडली.






जेव्हा ते घरी परत आले तेव्हा दरवाजा सहज उघडला गेला. “कोणतीही गोष्ट आता दरवाजा अडवत नव्हती.” अबीगैल यामुळे खूप अचंबित झाली.

त्यांनी खाणे स्वयंपाकघरात नेले आणि त्यांनी टेबल सजवले. “बघा, किती जागा आहे,” अबीगैलची आई म्हणाली. आपले खाणे टेबलवर व्यवस्थितपणे मावले. आणि आपल्या सर्वांना बसण्यासाठी खुर्च्या आहेत.”



रात्री खाल्लानंतर, सगळ्यांनी स्वच्छता केली.अबीगैलने स्वयंपाकघर साफ केले आणि म्हटले, “मला हे माहीत नव्हते आपले घर एवढे मोठे आहे.” आईने बाथटबमधून सायकलीचे ग्रीस घासून साफ केले.



अबीगैलने सुचवले, “कदाचित आपण पाळीव प्राण्यांना परत घरात येऊ द्यायला हवे,” आणि सगळ्यांना हा विचार एक अद्‌भुत विचार वाटला. त्यांनी तीन मांजरे, दोन कुत्री, ससा आणि गिनी पिगला परत घरात घेतले. आणि प्रत्येकजण या गोष्टीवर सहमत होते की त्यांचे जीवन अद्‌भुत, आणि पहिल्यापेक्षा अधिक चांगले झाले आहे.